RNI No. MAHBIL /2009/40124

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग पाच

वर्ष १२, अंक ६(२)] गुरुवार, मार्च ५, २०२६/फाल्गुन १४, शके १९४७ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २३.००

असाधारण क्रमांक ११

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानसभेत व महाराष्ट्र विधानपरिषदेत सादर केलेली विधेयके.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

महाराष्ट्र विधानसभेत दिनांक **५ मार्च, २०२६** रोजी पुरःस्थापित करण्यात आलेले खालील विधेयक महाराष्ट्र विधानसभा नियम ११६ अन्वये प्रसिद्ध करण्यात येत आहे :—

L. A. BILL No. IX OF 2026.

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA STAMP ACT.

सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९.

महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.

१९५८ चा ६०.

ज्याअर्थी, यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सत्त्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव.

१. या अधिनियमास, महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा) अधिनियम, २०२६, असे म्हणावे.

सन १९५८ चा अधिनियम क्रमांक ६० याच्या कलम ५२अ ची सुधारणा.

२. महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या कलम ५२अ मध्ये,— १९५८ चा ६०.

(क) पोट-कलम (१) मधील,—

(एक) "पाच लाख" या मजकुराऐवजी, "वीस लाख" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) खंड (ब) मधील, "संबंधित" या मजकुराऐवजी, "सह नोंदणी महानिरीक्षक आणि मुद्रांक अधीक्षक आणि संबंधित" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

(ख) पोट-कलम (२) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

"(२) (अ) असा अर्ज मिळाल्यावर,—

(एक) अपर मुद्रांक नियंत्रक, जर सवलतीची रक्कम वीस लाख रुपयांच्या वर आणि एक कोटी रुपयांपर्यंत असेल तर ;

(दोन) सह नोंदणी महानिरीक्षक आणि मुद्रांक अधीक्षक, जर सवलतीची रक्कम पन्नास लाख रुपयांच्या वर आणि एक कोटी रुपयांपर्यंत असेल तर ;

(तीन) विभागाचा संबंधित नोंदणी उप महानिरीक्षक आणि मुद्रांक उप नियंत्रक, जर सवलतीची रक्कम वीस लाख रुपयांच्या वर आणि पन्नास लाख रुपयांपर्यंत असेल तर,

त्यावर विचार करील आणि अशी सवलत द्यावी किंवा कसे याचा निर्णय घेईल आणि तद्नुसार ती सवलत मंजूर करील.

(ब) सवलतीची रक्कम एक कोटी रुपयांपेक्षा अधिक असेल तर, खंड (अ) मध्ये, नमूद केलेले प्राधिकारी, असा अर्ज, त्यावरील आपल्या शेऱ्यांसह मुख्य नियंत्रक महसुली प्राधिकाऱ्याकडे निर्णयार्थ सादर करतील.".

उद्देश व कारणे यांचे निवेदन

महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम (१९५८ चा ६०) याच्या कलम ५२अ मध्ये खराब झालेल्या किंवा गैरवापर केलेल्या किंवा वापरासाठी आवश्यक नसलेल्या मुद्रांकासाठी किंवा चलानाद्वारे भरलेल्या रोख रकमेसाठी मुद्रांक शुल्काच्या परताव्याच्या प्रदानाची तरतूद आहे. उक्त कलम ५२अ अन्वये मुख्य महसूल नियंत्रण प्राधिकाऱ्यांच्या अधीन असलेल्या विविध प्राधिकाऱ्यांना वीस लाखांपेक्षा अधिक असणार नाही इतक्या रकमेच्या शुल्काच्या परताव्यास मंजुरी देण्यासाठी अधिकार प्रदान केलेले आहेत आणि मुख्य महसूल नियंत्रण प्राधिकाऱ्यास वीस लाखांपेक्षा अधिक असणाऱ्या रकमेच्या शुल्काच्या परताव्यास मंजुरी देण्यासाठी अधिकार प्रदान केले आहेत.

२. मालमत्तांच्या व्यवहारांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे, त्यामुळे मुद्रांक शुल्काच्या परताव्यासाठी अनेक अर्ज दाखल होत आहेत. काळाच्या ओघात, मालमत्तांच्या किंमतीत वाढ झाल्यामुळे, मुद्रांक शुल्कात देखील वाढ झाली आहे. अशा परताव्यासाठी मुख्य महसूल नियंत्रण प्राधिकाऱ्यांच्या अधीन असलेल्या विविध प्राधिकाऱ्यांची आर्थिक अधिकारिता ही, मुद्रांक शुल्काच्या वीस लाख रुपयांपर्यंत असल्यामुळे, मुख्य महसूल नियंत्रण प्राधिकाऱ्याकडील अशा अर्जांच्या संख्येत वाढ झाली आहे. मुख्य महसूल नियंत्रण प्राधिकाऱ्याकडे असे परताव्याचे अर्ज साचून राहिल्यामुळे ते निकालात काढण्याची प्रक्रिया मंदावली आहे.

म्हणून, अशा अधिकारांचे विकेंद्रीकरण करण्याकरिता आणि असे परतावा अर्ज जलद गतीने निकालात काढण्यासाठी मुख्य महसूल नियंत्रण प्राधिकाऱ्याच्या अधीन असलेल्या प्राधिकाऱ्यांच्या आर्थिक अधिकारितेमध्ये वाढ करणे शासनास इष्ट वाटते. अशा परताव्याचे अधिकार विद्यमान प्राधिकाऱ्यांबरोबरच, सह नोंदणी महानिरीक्षक आणि मुद्रांक अधीक्षक यांना देण्याचे देखील प्रस्तावित केले आहे. वरील प्रयोजनांसाठी, उक्त अधिनियमाच्या कलम ५२अ मध्ये सुधारणा करण्याचे प्रस्तावित आहे.

३. वरील उद्दिष्टे साध्य करणे हा या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक ४ मार्च, २०२६.

चंद्रशेखर बावनकुळे,
महसूल मंत्री.

विधान भवन,
मुंबई,
दिनांक ५ मार्च, २०२६.

जितेंद्र भोळे,
सचिव-१,
महाराष्ट्र विधानसभा.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.